# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 07/04/2018 रोजी (का.प.क्र.24) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

शनिवार दिनांक 07 एप्रिल 2018 रोजी (का.प.क्र .24) मा.सभापती श्री.गजानन रामकिसन बारवाल यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 12-15 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा. उपआयुक्त श्री.रविंद्र निकम, नगरसचिव श्री.डी डी सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य
02. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
03. स.स.श्री.सिताराम इसराम सुरे
04. स.स.श्री.अजिम अहेमद रफिक
05. स.स.श्री.ऋषिकेश चंद्रकांत खैरे
06. स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
07. स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले
08. स.स.श्री.सोहेल शकिल शेख
09. स.स.श्रीमती मनिषा बालाजी मुंडे
10. स.स.श्री.सय्यद मतीन रशिद
11. स.स.श्रीमती शेख नरगीस सलिम
12. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे

श्रीमती संगिता वाघुले :सनीसेंन्टर पासून ते पिसादेवी रस्त्याचे पॅचवर्क करण्यात येईल असे मागिल बैठकीत सांगण्यात आले होते अदयाप काम सुरू केले नाही.अधिकारी यांना फोन केला तर बंद असतो.

कार्य.अभियंता : आंबेडकरनगर चौक ते सनीसेंन्टर पर्यत काम केले आहे तेथून पूढे रस्ता खराब आहे तेथे डायरेक्ट पॅचवर्क करता येणार नाही त्यावर मॅटल झाल्यानंतर पॅचवर्क करावे लागेल.

मा.सभापती : यात शहर अभियंता यांनी पाहणी करावी ताबडतोब काम करावे.

श्री.रेणुकादास वैद्य : मनपाच्या शाळेत 43 शिक्षक तासिका बेसवर अनेक वर्षापासून काम करतात त्यांना ठराविक वेतन देण्याचा सर्वसाधारण सभेने ठराव मंजूर केला पुढे कार्यवाही केली नाही. प्रशासकीय समिती गठीत आहे त्या समितीने बैठक घेऊन योग्य तो 02 दिवसात लवकर निर्णय घ्यावा.

मा.सभापती :स.सदस्यांनी जी सुचना केली त्या बाबत उपआयुक्त प्रशासन यांनी दखल घेऊन कार्यवाही करावी त्या शिक्षकांना न्याय दयावा तसा प्रस्ताव तयार करून मान्यतेसाठी आणावा.

श्रीमती मनीषा मुंढे : काही माध्यमिक शिक्षकही आहे ते ही तासिका बेसवर आहे त्यांना 6000रू महिला पडतो त्यात त्यांचा खर्च भागत नाही त्यांनाही पगार वाढ करावी.

श्री.रेणुकादास वैद्य : माणिक हॉस्पीटला आग लागली होती त्यावेळी मनपाची यंत्रणा कुचकामी ठरली मनपाचा अग्निशमन विभाग सुसज्ज करणे आवश्यक आहे.अक्षरशा तेथील नागरीकांना रूग्ण झोळीत घालून खाली आणावे लागते.तेथे मनपाची यंत्रणा कुचकामी ठरली आवश्यक त्या सुविधा अशा वेळी या विभागाकडून दिल्या जात नाही. या हॉस्पीटलमध्ये दिल्या गेल्या नाही. या विभागासाठी गाडया खरेदीचा ठराव झाला त्या बाबत काय कार्यवाही केली.

अग्निशमन अधिकारी : पाच गाडया या विभागासाठी घेण्याचे प्रस्तावित आहे. पुढे कार्यवाही झाली नाही. माणिक हॉस्पीटलमध्ये वेल्डींगचे काम चालू होते ते करीत असतांना खाली स्पार्क होऊन रॉ मटेरियलला आग लागली इमारतीचे काम करणार होते त्यांची माहिती दिली नव्हती. तेथे काम चालू असल्यामूळे त्यांची जी यंत्रणा अर्धवट अवस्थेत होती चालू नव्हती.

श्री.रेणुकादास वैद्य :यंत्रणा चालू नव्हती तर अग्निशमनविभागाने पाहणी का केली नाही.शहरातही इतर किती ठिकाणी यंत्रण बंद आहे याची शहानिशा मनपाचा अग्निशमन विभाग करतो की नाही.

श्री.राजगौरव वानखेडे : माणिक हॉस्पीटलला जो प्रकार झाला त्यात मनपाची यंत्रण कुचकामी ठरली फटाकेला आग लागली तेंव्हाही मनपाची यंत्रणा चांगल्या रितीने काम करू शकले नाही. अनेक संचिका लालफितीत अडकल्या शहरातील जेवढे हॉस्पीटल असेल कार्यालय असेल इतर मोठमोठया इमारती असतील तेथे अग्निशमन यंत्र सुसज्ज आहे की नाही याचे ऑडीट करावे. एनओसी देतांना तेथे प्रत्यक्ष पाहणी होत नाही का ? आता चौकशी समिती नियुक्त केली त्यात कोणते अधिकारी आहे.

उपआयुक्त-प्रशासन : त्या चौकशी समितीत मी स्वतः व श्री.काझी आहेत.

श्री.राजगौरव वानखेडे : त्या विभागाचे विभाग प्रमुख श्री. रविंद्र निकम हे असे असतांना त्यांना चौकशी समिती सदस्य म्हणून काम दिले हे कितपत योग्य आहे.दुसरे चौकशी अधिकारी नेमावे शहरातील जेव्हढे हॉस्पीटल इतर शासकीय इमारती असेल त्या सर्व मोठया इमारतीचे ऑडीट करावे.त्यांनी फायर एनओसी घेतली की नाही.तेथे यंत्रणा कार्यरत आहे की नाही ते नियोजन करून या विभागासाठी आवश्यक सर्व साहित्य पुरवीण्यात यावे.

श्रीमती किर्ती शिंदे : अग्निशमन विभाग सक्षम करावा तेथे कर्मचारी दयावे मनपाच्या आस्थापनेवर कर्मचारी संख्या कमी आहे आकृतींबधला सभेने मंजूरी दिली शासनाकडे पाठवावे. मंजूरी घ्यावी.अग्शिशमनचे पाच केंद्र उभारणार होतो त्या बाबतीत काय कार्यवाही केली.

उपआयुक्त प्रशासन :अग्निशमन विभागाचा विभाग प्रमुख म्हणून चार्ज आहे परंतु माझेकडे प्रशासकीय बाबी संबधीचे नियोजन आहे,उर्वरीत सर्व कामे करण्याचे अधिकार 2006 च्या शासन निर्णया नुसार मुख्य अग्निशमन अधिकारी यांना आहे. प्रशासकीय संचिकाच माझेकडे येतात.

श्री.रेणुकादास वैद्य : या विभागाची संपूर्ण जबाबदारी माझेवर नाही असे उत्तर देणे योग्य नाही. विभाग प्रमुखानी अग्निशमन विभागाची संपुर्ण माहिती घेतली पाहिजे.

उपआयुक्त-प्रशासन :या विभागाची माहिती घेत असतो, टेक्नीकली काही सुचना असेल त्या केल्या जातात.

मा.सभापती : विभाग प्रमुख म्हणून श्री. निकम यांनी अग्निशमन विभागाची सर्व माहिती घ्यावी व त्यानुसार काम करावे.

श्री.राजगौरव वानखेडे : अग्निशमन विभागासाठी वाहन इतर वाहन जेंटीग मशीन का घेत नाही.

उपआयुक्त-प्रशासन : श्री. कोल्हे यांचेशी चर्चा केलेली आहे.

श्रीमती मनीषा मुंढे : माझे वार्डात छोटया गल्ल्या आहे मोठी अग्निशमन गाडी जात नाही छोटया गाडया खरेदी कराव्यात.

श्री.सिताराम सुरे : पाच केंद्र उभारणार होतो त्याचे काय कार्यवाही केली.

कार्य.अभियंता : तीन ठिकाणी केंद्र उभारण्याचे नियोजन होते.टी व्ही सेन्टर व डीमार्ट जवळ केंद्र उभारणे बाबत सिडकोची एनओसी मागितली होती ती मिळाली नाही. त्यांनी असे म्हटले की मनपाच प्लॅर्नींग ऑथर्टी आहे.वाहन खरेदीची मागणी केली होती 23 टक्के अबाऊने टेंडर आले होते.

उपअभियंता-यांत्रिकी : गाडया खरेदी बाबत डिसेबर 17 मध्ये निविदा झाली होती एजन्सीला वाटाघाटीसाठी बोलविले होते नंतर कचरा समस्या मूळे पुन्हा कार्यवाही झाली नाही.

श्री.राजगौरव वानखेडे : वाटाघाटी होत नसेल तर पुन्हा रिकॉल करावे.

मा.सभापती : गाडया खरेदी बाबत त्वरीत कार्यवाही करावी अग्निशमन विभागासाठी आवश्यक साहित्य दयावे. कर्मचारी दयावे.

| | |
|---|---|
| उपअभियंता-न.र | : केंद्र उभारणीसाठी जागा निश्चित केल्यानंतर एनओसी दिली जाइल. |
| मा.सभापती | : प्रशासनाने याची गंभीर दखल घ्यावी या बाबत ज्या ज्या अडचणी असेल त्या टी पी विभागाशी समन्वय करून सोडवावी.ताबडतोब एनओसी घेऊन कार्यवाही करावी.जागा निश्चित कराव्यात. |
| श्रीमती संगिता वाघुले | : शहरातील इतर हॉस्पिटलमध्ये अग्निशमन यंत्र बसविलेले होते का पाहणी करावी. |
| मा.सभापती | : शहरातील सर्व हॉस्पीटलची शासकीय इमारती शाळा, व इतर शहरातील मोठमोठया इमारती यांना फायरची एनओसी नाही तेथे प्रत्यक्ष पाहणी करावी सर्वे करावा व यांची दखल प्रशासनाने घ्यावी. |
| श्रीमती स्वाती नागरे | : जेटींग मशीन मागणी केली तरी दिले जात नाही. |
| श्री.सिताराम सुरे | : जेटींग मशीन का खरेदी केले जात नाही.झोन क्र.4,5 मिळून एक जेंटींग मशीन आहे. जनतेच्या कामासाठी जर पैसा नसेल तर सभा घेऊन अर्थ नाही. |
| उपअभियंता श्री.पंडीत | : व्हॅवचर तयार आहे पेमेन्ट देणे बाकी आहे. |
| मा.सभापती | : जेंटींग मशीन ताबडतोब खरेदी करावे त्यांना ताबडतोब पेमेंन्ट दयावे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | : शहरातील पुर्ण शाळेच्या इमारतीत अग्निशमन यंत्र असावे.अशी सक्ती करावी. |
| श्रीमती किर्ती शिंदे | : वार्डात 6 सफाई कर्मचारी कमी आहे. ते देण्यात यावे.आस्थापनेवरील कर्मचारी दयावे. |
| उपआयुक्त-प्रशासन | : 215 कर्मचारी खाजगी एजन्सीकडून घेणे संबधीची संचिका प्रशासनाच्या मंजूरीसाठी आहे. मंजूरी मिळाल्यानंतर मजूर कर्मचारी दिले जातील. आकृतीबंध तीन दिवसात शासनाकडे पाठविण्यात येईल. |
| श्रीमती संगिता वाघुले | : दिनांक 18-10-2012 च्या सर्वसाधारण सभेत शमा ड्रामा असोश्एिशन व युवक कल्याण मंडळ औरंगाबाद द्वारे स्त्री भ्रुणहत्या विरोधी संदर्भात लघु चित्रपट दाखवून त्या द्वारे जनजागृती करण्या बाबतचा प्रस्ताव मंजूर केलेला होता त्याची अमलबजावणी होत नाही त्या प्रस्तावास या सभागृहाने मंजूरी दयावी. |
| मा.सभापती | : या बाबत योग्य ती कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते. |
| श्रीमती किर्ती शिंदे | : तीन वर्षापासून महिला बाल कल्याण समितीच्या माध्यमातून महिला,मुलीसाठी काय उपक्रम राबविले कोणते साहित्य वाटप करण्यात आले माहिती दयावी. |
| कक्ष प्रमुख(म.व बा.क) | : 03 वर्षाची माहिती सध्या माझेकडे नाही या वर्षी एमएससीआयटी तसेच टॅली प्रशिक्षण देण्याची कार्यवाही केली आहे.मोबाइल कोर्सेस घेणार आहे. |
| श्रीमती संगिता वाघुले | : स्लम व गरीब वसाहतीतील लाभार्थी घ्यावेत प्रशिक्षण सेंन्टर हे मध्यवर्ती ठिकाणी जवळ पटेल अशा ठिकाणी ठेवावे.अपंगासाठी विशेष सवलत असावी. |
| श्रीमती किर्ती शिंदे | : सायकल शिलाई मशीन वाटप करावे पिठाची गिरणी देण्यात यावे. |
| मा.सभापती | : या समितीच्या माध्यमातून काय करणे अपेक्षीत आहे संबधीत अधिकारी यांनी बैठक घ्यावी.योग्य ती कार्यवाही करावी पुढील सभेत माहिती दयावी. |
| श्री.सयद मतीन | : मनपाचे पथकाने गरीब रोजी रोटी वर असलेल्या लोकांच्या हातगाडया रस्त्यावर पलटी करून फळाचे नुकसान केले काही गाडया जप्त केल्या ही कार्यवाही करण्याची ही पध्दत बरोबर नाही. |
| प्रशासकीय अधिकारी | : मा.महापौर यांचे सुचना होत्याकी मुख्य बाजार पेठेतील रस्त्यावरील असलेले अतिक्रमण हटविणे त्यानुसार कार्यवाही केली. |
| मा.सभापती | : माल जप्त करणे दंड लावणे ई कायदेशीर कार्यवाही होणे अपेक्षीत असते.योग्य ती कार्यवाही करावी. |
| श्री.राजगौरव वानखेडे | : दिल्लीगेट ते हर्सुल रस्त्यावर बाजूला फर्निचरची अनधिकृत दुकाने थाटली आहे. तसेच सलीम अली सरोवरच्या बाजूच्या भागात भरती टाकून काही मिळकत धारकानी जागा ताब्यात घेऊन अतिक्रमण केले.कार्यवाही का होत नाही. |

| | |
|---|---|
| मा.सभापती | : प्रशासकीय अधिकारी यांनी तेथे पथक नेमून जाऊन पाहणी करावी संबधीतावर गुन्हे दाखल करावे,अतिक्रमण होणार नाही याची दखल घ्यावी. |
| प्रशासकीय अधिकारी | : त्या जागेवरून आठ ट्रक माल जप्त केला होता पुन्हा दुकाने थाटली असेल तर काढण्यात येतील. |
| मा.सभापती | :सलीम अली सरोवर बाजूला अतिक्रमण केले पाहणी करावी कार्यवाही करावी पोलीसात त्यांचे विरूध्द गुन्हे नोंदवावे. |
| श्रीमती स्वाती नागरे | : झोन 4 च्या बाजूला गजाननगर भागात ड्रेनेज लाईन टाकायची तेथे अतिक्रमण झाले त्यामूळे काम होत नाही. |
| वार्ड अभियंता | : संबधीतास दोन वेळेस पत्र दिले अतिंम स्टेजला कार्यवाही चालू आहे. |
| मा.सभापती | : तातडीने कार्यवाही करावी. |
| श्रीमती मनीषा मुंढे | : माझे वार्डातील नाल्याचे भिंतीचे काम होत नाही. |
| कार्य.अभियंता | : सोमवारी कामास सुरूवात होईल. |
| श्रीमती नरगीस शेख | : सन 17-18 च्या बजेट मध्ये कटकटगेट ते पोलीस मेस रस्त्यासाठी तरतूद ठेवली होती ती तरतूद कूठे खर्च केले. |
| कार्य.अभियंता | : शंभर कोटीच्या रस्त्यामध्ये त्या रस्त्याच्या कामाचा समावेश करण्यात आला आहे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | : नगररचना विभागाचा चार्ज शहर अभियंता यांचेकडे देणे संबधी आदेशीत केले होते कार्यवाही का झाली नाही. |
| मा.सभापती | : प्रशासनाने त्वरीत कार्यवाही करावी. |
| श्रीमती संगिता वाघुले | : वार्डात लाईट बंद आहे ठेकेदारांना बील देत नाही म्हणून काम करीत नाही. अधिकारी फोन उचलत नाही. 14 एप्रिल पुर्वी लाइट चालू करावे. |
| मा.सभापती | : 14 एप्रिल पुर्वी लाईटचे काम करावे. ठेकेदारानी कामे थांबवू नये त्यांना ताकीद दयावी. |
| श्री.सिताराम सुरे | : जुने लाईट फिटींग लावणार होते अदयाप कार्यवाही केली नाही. |
| उपअभियंता-श्री.देशमुख | : स.श्री. सुरे यांचे वार्डात काम चालू आहे आज सर्व लाईटची कामे होतील. |

**विषय क्र. 353 : (कार्य.अभि.-1 ते 3 व 8)**

मुख्य पशुसंवर्धन अधिकारी महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत मोकाट श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रिया कार्यक्रम राबविण्यासाठी सन 2018-19 या एका आर्थिक वर्षासाठी श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रिया कार्यक्रमासाठी AWBI मान्यता प्राप्त संस्थामार्फत ई-निविदाद्वारे निविदा मागविण्यात आल्या असता, सहाव्या वेळी निविदेत खालीलप्रमाणे दोन पात्र निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | तपशिल | व्हेटस् सोसायटी हैद्राबाद यांचे दर | ब्ल्यु क्रॉस सोसायटी पुणे यांचे दर | वाटाघाटीअंती कमी केलेले दर |
|---|---|---|---|---|
| 01. | शहरातील मोकाट श्वान तक्रारीच्या ठिकाणाहून स्वत:च्या वाहनातून पकडून आणणे, निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे पश्चात सुश्रुषा आणि पुनर्वसन करणे. | रूपये 1090/- | रूपये 951/- | रूपये 900/- |
| 02. | तक्रारीच्या ठिकाणाहून धोकादायक, पिसाळलेले व दुरूस्त न होवू शकणारे, रोगग्रस्त, जखमी श्वान पकडून आणणे व सी.आर.सी.यु. च्या नियंत्रणाखाली इंजेक्शनद्वारे दया मरण देणे. | रूपये 1090/- | रूपये 421/- | रूपये 300/- |

तुलनात्मकदृष्टीने मे.ब्ल्यु क्रॉस सोसायटी, पुणे यांचे दर श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रिया कार्यक्रमासाठी रूपये 951.00 प्रती श्वान व धोकादायक, पिसाळलेले, श्वानास दया मरण देणे रूपये 421/- प्रती श्वान हे सर्वात कमी आहेत. त्यांचे बरोबर मा.अतिरिक्त आयुक्त यांचे दालनात दराचे वाटाघाटी केली असता, प्राप्त

निविदा दर रूपये 951.00 चे कमी करून रूपये 900/- व धोकादायक, पिसाळलेले, श्वानास दया मरण देणे रूपये 421/- चे कमी करून रूपये 300.00 प्रती श्वान या दरानुसार सन 2018-19 या आर्थिक वर्षासाठी श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रिया कार्यक्रमासाठी ब्ल्यु क्रॉस, पुणे या संस्थेने संमती दिलेली आहे. या दरास मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी मंजूरी दिलेली आहे.या दरानुसार श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रिया कार्यक्रमासाठी सन 2018-19 या आर्थिक वर्षाकरीता अंदाजे रूपये 25,00,000/- एवढा खर्च होणार आहे.

करीता सन 2018-19 या एका आर्थिक वर्षासाठी श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रिया कार्यक्रम दर रूपये 900/- प्रती श्वान व धोकादायक,पिसाळलेले, दया मरण देणे रूपये 300/- प्रती श्वान प्रमाणे या प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : हा विषय मंजूर करण्यात येतो. परंतु उपआयुक्त श्री. निकम यांचा या विषयी अभिप्राय घ्यावा.

श्री.राजगौरव वानखेडे : माझे वार्डात डुकराची संख्या वाढली आहे बदोबस्त करावा.मनपाचेच कर्मचारी यांनी ते आणून सोडले आहे त्यांना घेऊन जाण्याचे सांगावे.

पशुसंवर्धन अधिकारी :ज्या ठिकाणी वराह आहे त्या मालकास नोटीस देतो व ते घेऊन जाण्याची सुचना केली जाते.

मा.सभापती : सदस्यांनी केलेल्या सूचनाची दखल घ्यावी. विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत मोकाट श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रिया कार्यक्रम राबविण्यासाठी सन 2018-19 या एका आर्थिक वर्षासाठी श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रिया कार्यक्रमासाठी AWBI मान्यता प्राप्त संस्थामार्फत ई-निविदाद्वारे तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त झालेल्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.ब्ल्यु क्रॉस सोसायटी, पुणे यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार त्यांचेकडून सन 2018-19 या एका आर्थिक वर्षासाठी श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रिया कार्यक्रम दर रूपये 900/- प्रती श्वान व धोकादायक,पिसाळलेले, दया मरण देणे रूपये 300/- प्रती श्वान प्रमाणे करून घेणेस तसेच या कार्यक्रमासाठी येणाऱ्या अंदाजे रूपये 25,00,000/- लक्षच्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 354 : (कार्य.अभि.-2)**

विषय : वार्ड क्र.114 अंतर्गत हॉटेल शिदोरी ते श्री.प्रकाश महाजन यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या कामाचे ठेकेदार व्हि.बी.ए. इन्फ्रा यांचेकडून 12.12 टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.7472694.03/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.-AMCA-247380-1 सन 2017-2018

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता-2 महानगरपालिका औरंगाबाद |
| 2. | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.114 अंतर्गत हॉटेल शिदोरी ते श्री.प्रकाश महाजन यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | 8503210.00/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 8503293.16/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | ई-टेंडर विभाग महानगरपालिका औरंगाबाद |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 01/11/2017 ते 06/11/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 17/11/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | चार |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1 | व्हि.बी.ए. इन्फ्रा | 7472694.03 | 12.12% कमी दराने |
| 2 | मे.ए.एस. कन्स्ट्रक्शन | 7727792.82 | 9.12% कमी दराने |
| 3 | व्हि.टी. पाटील इंजि ॲण्ड कॉन्ट्रक्टर | 7893522.00 | 7.17% कमी दराने |
| 4 | मो.अहेमद सिध्दीकी | 8182719.00 | 3.77% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | (1) विविध विकास कामे व मुलभुत सुविधा पुरविणे सातारा-देवळाई |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय. |
| | तरी विषयांकित प्रकरणी ठेकेदार व्हि.बी.ए. इन्फ्रा यांचेकडून 12.12 टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.7472694.03/-पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर | |

मा.सभापती : विषय क्रमांक 354 ते 359 मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.114 अंतर्गत हॉटेल शिदोरी ते श्री.प्रकाश महाजन यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार व्हि.बी.ए. इन्फ्रा यांचेकडून 12.12 टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.7472694.03/- पर्यंत काम करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 355 : (कार्य.अभि.-2)**

विषय : वार्ड क्र.114 अंतर्गत रेणुका माता मंदिर ते चाटे शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या कामाचे ठेकेदार ए.एस. कन्स्ट्रक्शन यांचेकडून 16.78 टक्के अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.22022690.40/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.-AMCA-259609-1 सन 2017-2018

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता-2 महानगरपालिका औरंगाबाद |
| 2. | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.114 अंतर्गत रेणुका माता मंदिर ते चाटे शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | 26464344.00/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 26464344.00/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती | ई-टेंडर विभाग महानगरपालिका औरंगाबाद |

| | | |
|---|---|---|
| | त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 01/11/2017 ते 06/11/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 04/01/2018 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | तीन |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1 | मे.ए.एस. कन्स्ट्रक्शन | 22022690.40 | 16.78% कमी दराने |
| 2 | मो.अहेमद सिध्दीकी | 23060566.20 | 12.86% कमी दराने |
| 3 | व्हि.बी.ए. इन्फ्रा | 23136695.02 | 12.57% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | (1) विविध विकास कामे व मुलभुत सुविधा पुरविणे सातारा-देवळाई |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय. |
| | तरी विषयाकिंत प्रकरणी ठेकेदार मे.ए.एस. कन्स्ट्रक्शन यांचेकडून 16.78 टक्के अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.22022690.40/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.114 अंतर्गत रेणुका माता मंदिर ते चाटे शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार ए.एस. कन्स्ट्रक्शन यांचेकडून 16.78 टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.22022690.40/- पर्यंत काम करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 356 : (कार्य.अभि.-9)</u>**

विषय :महाराष्ट्र शासनाच्या नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत संत एकनाथ रंगमंदिरात विविध कामे करणे या कामाचे ठेकेदार मे.संजीव याजनिक ॲण्ड असोसीएट्स यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.37% कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.1,28,41,358/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : निविदा दि.06/03/2018

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | वार्ड अभियंता कार्यालय क्र.09 |
| 2. | कामाचे स्वरुप | इमारतीत नविन कामे करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.सर्वसाधारण सभा दि.31/01/2018 विषय क्र.253 |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 1,49,96,331/- |

| | | |
|---|---|---|
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 12 फेब्रुवारी 2018 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 06 मार्च 2018 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 03 |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1 | मे.संजीव याजनिक ॲण्ड असोसीएटस् | 1,28,41,358/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.37% कमी दराने |
| 2 | मे.कंसेप्ट क्रियेटर, आनंदनगर, सिंहगड रोड, पुणे | 1,31,06,793/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 12.60% कमी दराने |
| 3 | मे.सरयु सीटींग कंपनी, मानेसर, गुरूग्राम हरीयाणा | 1,33,30,239 | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11.11% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे. | --- |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.37% कमी दराने |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | जिल्हा वार्षिक योजना (नाविन्यपुर्ण योजना) |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | मा.सर्वसाधारण सभा दि.30/01/2018 विषय क्र.253 |
| | तरी विषयांकित काम ठेकेदार मे.संजीव याजनिक ॲण्ड असोसीएटस् यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.37 टक्के कमी दराने म्हणजेच दरपत्रक र.रू.1,28,41,358/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर. | |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासनाच्या नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत संत एकनाथ रंगमंदिरात विविध कामे करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार मे.संजीव याजनिक ॲण्ड असोसीएट्स यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.37% कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.1,28,41,358/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 357 : (संचालक, प्राणी संग्रहालय)</u>**

संचालक,सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालय यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिका सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालयातील हिंस्त्र प्राणी वाघ, पांढरे वाघ, बिबट,तडस,कोल्हे,उदबिल्ला आणि मगर यांचे करीता प्रती दिन एकूण 120 किलो बीफ खरेदी करण्यात येते. सन 2018-19 या एका आर्थिक वर्षासाठी बीफ खरेदी करणेसाठी ई-निविदाद्वारे निविदा मागविण्यात आल्या असता, खालीलप्रमाणे तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव | निविदा धारकांचे दर | वाटाघाटीअंती कमी केलेले दर (प्रती किलो) | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.अब्दुल हमीद कुरेशी | रू.215.00 प्रती किलो | --- | |
| 2 | श्री.फेरोजखान रहेमानखान | रू.208.00 प्रती किलो | --- | |
| 3 | श्री.अब्दुल अजीम कुरेशी | रू.199.00 प्रती किलो | रूपये 180/- प्रती किलो | |

तुलनात्मकदृष्टीने श्री.अब्दुल अजीम कुरेशी यांचे दर बीफ खरेदीसाठी रूपये 199.00 प्रती किलो हे सर्वात कमी आहेत. त्यांचे बरोबर मा.अतिरिक्त आयुक्त यांचे दालनात दराचे वाटाघाटी केली असता, प्राप्त निविदा दर रूपये 199.00 प्रती किलो कमी करून रूपये 180.00 प्रती किलो या दरानुसार सन 2018-19 या आर्थिक वर्षासाठी बीफ खाद्य पुरवठा करणेची संमती दिलेली आहे. या दरास मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी मंजुरी दिलेली आहे. या दरानुसार बीफ खरेदीसाठी सन 2018-19 या आर्थिक वर्षाकरीता अंदाजे रूपये 67,60,800/- एवढा खर्च होणार आहे.

करीता सन 2018-19 या एका आर्थिक वर्षासाठी प्राणी संग्रहालयातील हिंस्त्र प्राण्यांसाठी लागणारे बीफ खाद्य खरेदी करणे करीता रूपये 180.00 प्रती किलो नुसार येणारा अंदाजीत खर्च रूपये 67,60,800/- यास मान्यता व्हावी, करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालयातील हिंस्त्र प्राणी वाघ, पांढरे वाघ, बिबट,तडस,कोल्हे,उदबिल्ला आणि मगर यांचे करीता प्रती दिन एकूण 120 किलो बीफ खरेदी करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.अब्दुल अजीम कुरेशी यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार त्यांचेकडून सन 2018-19 या एका आर्थिक वर्षासाठी प्राणी संग्रहालयातील हिंस्त्र प्राण्यांसाठी लागणारे बीफ खाद्य खरेदी करणे करीता रूपये 180.00 प्रती किलो नुसार व त्यासाठी येणाऱ्या अंदाजीत रूपये 67,60,800/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 358 : (कार्य.अभि.-9)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जालना रोड वरील मुळे तापडिया कॉम्पलेक्स मध्ये महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेमध्ये वार्ड कार्यालय क्र.09 मधील वार्ड अधिकारी विभाग स्थलांतरीत करणे करीता इमारतीमध्ये विविध स्वरूपाची कामे करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन 2015-2016 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.24,99,375/- चे तयार करण्यात आले होते.

सदर अंदाजपत्रकास प्राप्त तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त करून विषयाकिंत कामासाठी ई-महा-निविदा विभागा मार्फत निविदा सूचना प्रसिध्द करून निविदा मागविल्या असता, निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 04 निविदा प्राप्त झाल्या असून प्राप्त निविदात सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.63% कमी दराची मे.एस.एम. कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा प्राप्त झाली आहे. प्राप्त निविदेस मंजुरी दिल्यावर संबंधीत कंत्राटदारास सदर कामाचे कार्यादेश देण्यात आले आहे.

प्रत्यक्ष स्थळावर काम सुरू असतांना अंदाजपत्रकात नमुद बाबी शिवाय पाण्याची व्यवस्था करणे, सि.सि.टि.व्ही. कॅमेरे बसविणे, एल.ई.डी. स्क्रीन बसविणे व कार्यालयात इन्व्हर्टर बसविणे इत्यादी बाबींचे कामे करणे आवश्यक असल्याने त्यासाठी मुळ बाबींमध्ये होणारी वाढ रक्कम रू.8,72,000/- व अतिरिक्त बाबींकरीता रक्कम रू.9,78,000/- असे एकूण रक्कम रू.18,50,000/- खर्च आवश्यक असल्याने त्या कामासाठी सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.43,49,375/- चे तयार करण्यात आले आहे.

त्यानुसार मुळ मंजुर अंदाजपत्रकातील नमुद कामे मुळ मंजुर निविदा दरात म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.63% कमी दराने व अतिरिक्त बाबींचे काम अंदाजपत्रकीय दराने मुळ कामाचे कंत्राटदार मे.एस.एम.कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडून करून घेणेसाठी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

करीता सदर कामाच्या मुळ अंदाजपत्रकातील समाविष्ठ बाबींचे कामे मंजुर निविदा दर 13.63% कमी दराने व अतिरिक्त बाबींचे काम अंदाजपत्रकीय दराने मुळ कामाचे कंत्राटदार मे.एस.एम.कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडून करून घेणेस्तव प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जालना रोड वरील मुळे तापडिया कॉम्पलेक्स मध्ये महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेमध्ये वार्ड कार्यालय क्र.09 मधील वार्ड अधिकारी विभाग स्थलांतरीत करणे करीता इमारतीमध्ये विविध स्वरूपाची कामे करणेच्या वाढीव कामासाठी येणाऱ्या व प्रत्यक्ष स्थळावर काम सुरू असतांना अंदाजपत्रकात नमुद बाबी शिवाय पाण्याची व्यवस्था करणे, सि.सि.टि.व्ही. कॅमेरे बसविणे, एल.ई.डी. स्क्रीन बसविणे व कार्यालयात इन्व्हर्टर बसविणे इत्यादी बाबींचे कामे करणे आवश्यक असल्याने त्यासाठी मुळ बाबींमध्ये होणारी वाढ रक्कम रू.8,72,000/- व अतिरिक्त बाबींकरीता रक्कम रू.9,78,000/- असे एकूण रक्कम रू.18,50,000/- च्या खर्चास व सदर कामाचे सुधारीत रक्कम रू.43,49,375/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत येते. तसेच मुळ मंजुर अंदाजपत्रकातील नमुद कामे मुळ मंजुर निविदा दरात म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.63% कमी दराने व अतिरिक्त बाबींचे काम अंदाजपत्रकीय दराने मुळ कामाचे कंत्राटदार मे.एस.एम.कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडून करून घेणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 359 : (कार्य.अभि.-9)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जालना रोड वरील मुळे तापडिया कॉम्पलेक्स मध्ये महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेमध्ये वार्ड कार्यालय क्र.09 मधील वार्ड अभियंता विभाग स्थलांतरीत करणे करीता इमारतीमध्ये विविध स्वरूपाची कामे करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन 2015-2016 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.24,57,913/- चे तयार करण्यात आले होते.

सदर अंदाजपत्रकास प्राप्त तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त करून विषयाकिंत कामासाठी ई-महा-निविदा विभागा मार्फत निविदा सूचना प्रसिध्द करून निविदा मागविल्या असता, निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 04 निविदा प्राप्त झाल्या असून प्राप्त निविदात सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.63% कमी दराची मे.एस.एम. कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा प्राप्त झाली आहे. प्राप्त निविदेस मंजुरी दिल्यावर संबंधीत कंत्राटदारास सदर कामाचे कार्यादेश देण्यात आले आहे.

प्रत्यक्ष स्थळावर काम सुरू असतांना अंदाजपत्रकात नमुद बाबी शिवाय पाण्याची व्यवस्था करणे, सि.सि.टि.व्ही. कॅमेरे बसविणे, एल.ई.डी. स्क्रीन बसविणे व कार्यालयात इन्व्हर्टर बसविणे इत्यादी बाबींचे कामे करणे आवश्यक असल्याने त्यासाठी मुळ बाबींमध्ये होणारी वाढ रक्कम रू.6,63,318/- व अतिरिक्त बाबींकरीता रक्कम रू.7,29,433/- असे एकूण रक्कम रू.13,92,751/- खर्च आवश्यक असल्याने त्या कामासाठी सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.38,50,664/- चे तयार करण्यात आले आहे.

त्यानुसार मुळ मंजुर अंदाजपत्रकातील नमुद कामे मुळ मंजुर निविदा दरात म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.63% कमी दराने व अतिरिक्त बाबींचे काम अंदाजपत्रकीय दराने मुळ कामाचे कंत्राटदार मे.एस.एम.कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडून करून घेणेसाठी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

करीता सदर कामाच्या मुळ अंदाजपत्रकातील समाविष्ठ बाबींचे कामे मंजुर निविदा दर 13.63% कमी दराने व अतिरिक्त बाबींचे काम अंदाजपत्रकीय दराने मुळ कामाचे कंत्राटदार मे.एस.एम.कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडून करून घेणेस्तव प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जालना रोड वरील मुळे तापडिया कॉम्पलेक्स मध्ये महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेमध्ये वार्ड कार्यालय क्र.09 मधील वार्ड अभियंता विभाग स्थलांतरीत करणे करीता इमारतीमध्ये विविध स्वरूपाची कामे करणेच्या वाढीव कामासाठी येणाऱ्या व प्रत्यक्ष स्थळावर काम सुरू

असतांना अंदाजपत्रकात नमुद बाबी शिवाय पाण्याची व्यवस्था करणे, सि.सि.टि.व्ही. कॅमेरे बसविणे, एल.ई.डी. स्क्रीन बसविणे व कार्यालयात इन्व्हर्टर बसविणे इत्यादी बाबींचे कामे करणे आवश्यक असल्याने त्यासाठी मुळ बाबींमध्ये होणारी वाढ रक्कम रू.6,63,318/- व अतिरिक्त बाबींकरीता रक्कम रू.7,29,433/- असे एकूण रक्कम रू.13,92,751/- च्या खर्चास व सदर कामाचे सुधारीत रक्कम रू.38,50,664/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत येते. तसेच मुळ मंजुर अंदाजपत्रकातील नमुद कामे मुळ मंजुर निविदा दरात म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.63% कमी दराने व अतिरिक्त बाबींचे काम अंदाजपत्रकीय दराने मुळ कामाचे कंत्राटदार मे.एस.एम.कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडून करून घेणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>ऐनवेळचे विषय</u>

**<u>विषय क्र. 360 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.33 मिसरवाडी अंतर्गत श्रीकृष्णनगर श्री.जैस्वाल यांच्या घरापासून ते श्री.अब्दुल वासीद यांच्या घरापर्यंत सिंकदर कॉलनी 80 फुट डि.पी. रोड पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-16 दरसुची नुसार र.रू.29,42,214/- चे तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च मनपा अर्थसंकल्प सन 2017-18 मधील शासनाच्या सर्वसाधारण रस्ते अनुदान या योजनेच्या लेखाशिर्षा मधुन प्रस्तावित आहे. सदर अंदाजपत्रकास दिनांक 17/02/2018 रोजी मान्यता दिलेली आहे.

तरी वार्ड क्र.33 मिसरवाडी अंतर्गत श्रीकृष्णनगर श्री.जैस्वाल यांच्या घरापासून ते श्री.अब्दुल वासीद यांच्या घरापर्यंत सिंकदर कॉलनी 80 फुट डी.पी. रोड पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामाचे र.रू.29,42,214/- चे अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : ऐनवळचे विषय क्र.360 मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.33 मिसरवाडी अंतर्गत श्रीकृष्णनगर श्री.जैस्वाल यांच्या घरापासून ते श्री.अब्दुल वासीद यांच्या घरापर्यंत सिंकदर कॉलनी 80 फुट डी.पी. रोड पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.29,42,214/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 361 : (कर्मचाऱ्याचे अपील)</u>**

श्री.विपीन संतुकराव दसरे,(शिपाई), वॉर्ड कार्यालय-9 क्रांतीचौक, महानगरपालिका औरंगाबाद यांना कनिष्ठ लिपीक पदावरून शिपाई या पदावर कार्यालयीन आदेश, जा.क्र./मनपा/आस्था-1/2016/1668, दिनांक 14/10/2016 अन्वये पदावनत केल्याच्या आदेशाविरूध्द त्यांनी स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपिलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

मा.सभापती : श्री.विपीन संतुकराव दसरे,(शिपाई), वॉर्ड कार्यालय-9 या कर्मचाऱ्यास प्रशासनाने कनिष्ठ लिपीक पदावरून शिपाई पदावर पदावनत केलेले आहे, प्रशासनाने पदावनत केल्याच्या आदेशाविरूध्द त्यांनी स्थायी समितीकडे अपील सादर केलेले आहे, त्यांचे अपील मंजूर करण्यात येते. तसेच प्रशासनाने यापूर्वी त्यांना दिलेले पदावनतीचे आदेश रद्द करण्यांत येते, यासह मंजुरी देण्यांत येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.विपीन संतुकराव दसरे,(शिपाई), वॉर्ड कार्यालय-9 महानगरपालिका औरंगाबाद यांना कनिष्ठ लिपीक पदावरून शिपाई या पदावर पदावनत केल्यासंबंधीचे कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/आस्था-1/2016/1668, दिनांक 14/10/2016 रद्द करण्यांत येत आहे. त्यांना पदावनत केल्याच्या तारखेपासून पुनश्चः कनिष्ठ लिपीक या पदावर पुर्ववत कायम करण्याचा निर्णय घेण्यात येतो.

श्री.विपीन संतुकराव दसरे,(शिपाई), वॉर्ड कार्यालय-9,महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्थायी समिती समोर सादर केलेले अपील मंजूर करण्यांत येते. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. प्रशासनाने स्थायी समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी ताबडतोब करावी, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 362 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.05 अंतर्गत गरवारे स्टेडीयम येथे Windro Composting Shed बांधणे या कामाचे अंदाजपत्रक SSR सन 2017-18 च्या दरसुची नुसार रक्कम रू.39,11,771/- चे तयार करण्यात आले असून सदर अंदाजपत्रकास दिनांक 31/03/2018 रोजी मान्यता दिलेली आहे.

तरी झोन क्र.05 अंतर्गत गरवारे स्टेडीयम येथे Windro Composting Shed बांधणे या कामाचे र.रू.39,11,771/- चे अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : ऐनवेळचे विषय क्रमांक 362,363 व 364 मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.05 अंतर्गत गरवारे स्टेडीयम येथे Windro Composting Shed बांधणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.39,11,771/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 363 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेची प्राथमिक शाळा सिडको एन-7 येथील इमारत बांधकामाचा खर्च फोर्ब्स कंपनी लि. सीएसआर फंडामधुन होणार आहे. एकुण प्रकल्प किमंतीच्या 80% फंडाचा भार उचलण्यास कंपनी तयार असून 20% फंड औरंगाबाद महानगरपालिकेस उचलावा लागणार आहे.

वर्ष 2017-18 मध्ये अंदाजे 50 लक्ष रूपये काम होईल पैकी 10 लक्ष निधी महानगरपालिका व 40 लक्ष निधी कंपनी खर्च करेल असेच काम पुढील दोन वर्षात 2018-19 व 2020-2021 मध्ये होईल.

प्रस्ताव महानगरपालिकेच्या हिताचा असल्याने औरंगाबाद महानगरपालिका प्रकल्प किमंतीच्या 20% भार उचलण्यास तयार आहे. प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेची प्राथमिक शाळा सिडको एन-7 येथील इमारत बांधकामाचा खर्च फोर्ब्स कंपनी लि. सीएसआर फंडामधुन होणार असल्याने, एकूण प्रकल्प किमंतीच्या 80% फंडाचा भार उचलण्यास कंपनी तयार असून औरंगाबाद महानगरपालिका प्रकल्प किमंतीच्या 20% भार उचलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 364 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे मोहल्ला नागसेन कॉलनी येथील सामाजिक सभागृह ज्याचे क्षेत्रफळ तळ मजला व पहिला मजला असे एकूण क्षेत्रफळ 348 चौ.मी. असून सदरील सभागृह यापुर्वीच्या मा.स्थायी समिती ठराव क्र.28, दि.19/07/2017 अन्वये संकल्प विकास मंडळ या संस्थेस भाडेतत्वावर देणेसाठी प्रतीमाह रू.10,000/- प्रमाणे देणेसाठी मान्यता झालेली आहे. परंतु संस्थेने महानगरपालिकेकडे भाडे भरणा केलेले नाही.

दि.21/02/2018 रोजी अध्यक्ष ग्लोबल करिअर ॲकॅडमी, संजयनगर, औरंगाबाद या संस्थेने सदरचा हॉल रू.11,000/- प्रतीमाह प्रमाणे भाडेतत्वावर मिळणेसाठी मागणी केली आहे. त्याअनुषंगाने ही संस्था हॉलचा वापर सेवाभावी कार्यासाठी करणार असल्याने त्यांनी प्रतीमाह रू.11,000/- प्रमाणे भाडेतत्वावर मिळणेसाठी मागणी केलेली आहे. त्यास प्रशासकीय मान्यता झालेली असल्याने संस्थेच्या मागणीनुसार मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.753, दि.20/02/2015 च्या ठरावानुसार संस्थेने सदरील

सभागृहाची देखभाल, दुरूस्ती, विद्युत देयक स्वखर्चाने करणेच्या व प्रतीमाह भाडे रू.11,000/- प्रमाणे व इतर वेगळे या अटीस अधीन राहून संस्थेस भाडेतत्वावर देणेसाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सविनय सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे मोहल्ला नागसेन कॉलनी येथील सामाजिक सभागृह ज्याचे क्षेत्रफळ तळ मजला व पहिला मजला असे एकूण क्षेत्रफळ 348 चौ.मी. असून सदरील सभागृह यापुर्वीच्या मा.स्थायी समिती ठराव क्र.28, दि.19/07/2017 अन्वये संकल्प विकास मंडळ या संस्थेस भाडेतत्वावर देणेसाठी प्रतीमाह रू.10,000/- प्रमाणे देणेसाठी मान्यता झालेली आहे. परंतु संस्थेने महानगरपालिकेकडे भाडे भरणा केलेले नसल्याने व दि.21/02/2018 रोजी अध्यक्ष ग्लोबल करिअर ॲकॅडमी, संजयनगर, औरंगाबाद या संस्थेने सदरचा हॉल रू.11,000/- प्रतीमाह प्रमाणे भाडेतत्वावर मिळणेसाठी मागणी केली असल्याने, त्याअनुषंगाने ही संस्था हॉलचा वापर सेवाभावी कार्यासाठी करणार असल्याने संस्थेच्या मागणीनुसार मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.753, दि.20/02/2015 च्या ठरावानुसार संस्थेने सदरील सभागृहाची देखभाल, दुरूस्ती, विद्युत देयक स्वखर्चाने करणेच्या व प्रतीमाह भाडे रू.11,000/- प्रमाणे व इतर वेगळे या अटीस अधीन राहून संस्थेस भाडेतत्वावर देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

चर्चा :

मा.सभापती : शाहबाजार कत्तलखाना फी वसुलीचे काम सद्यस्थितीत प्रो.चॉईस मटन ॲण्ड चिकन शॉपी यांना देण्यांत आलेले आहे, त्यांनी कत्तलखाना फी वसूलीचे काम चांगल्याप्रकारे केलेले असल्यामुळे, पुढील पाच वर्षासाठी कत्तलखाना फी वसुलीचे काम देण्याची पत्र देवून विनंती वजा मागणी केलेली असल्याने, पुढील पाच वर्षासाठी कत्तलखाना फी वसूलीचे काम प्रो.चॉईस मटन ॲण्ड चिकन शॉपी यांना देण्यास मंजुरी देण्यांत येते.

सर्वसाधारण सभा दि.18/10/2012 ठराव क्र.928 नुसार सामाजिक जनजागृतीचे लघु चित्रपट दाखवण्याचे काम शमा ड्रामा असोसिएशन व युवक कल्याण मंडळ यांच्या नांवे मंजूर केलेले असल्यामुळे,सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयाची प्रशासनाने अंमलबजावणी करावी.

पार्थ शिक्षण संस्था, औरंगाबाद यांनी निवेदन देऊन विनंती केली आहे, पार्थ शिक्षण संस्था ही महिलांसाठी उपक्रम व ॲक्टीव्हीटी, शिवण क्लास व इतर क्लास, व्यायामशाळा त्यांना सुरू करावयाची आहे, महानगरपालिकेचे कम्युनिटी सेंटर एन-2, सिडको, जे सेक्टर भाडेतत्वावर देण्याची मागणी केलेली आहे, नियमानुसार भाडे भरण्यास सदर संस्था तयार आहे, या संस्थेस कम्युनिटी सेंटर मनपाच्या रेडीरेकनर नुसार भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यांत येते.

तसेच पेठेनगर,भावसिंगपुरा भागातील सुंदराआई सांडुजी बनकर बहुउद्देशीय सभागृह हे सामाजिक उपक्रम राबविणेसाठी भाडेतत्वावर देण्याची स्वयंभु सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. भावसिंगपुरा, औरंगाबाद यांनी मागणी केलेली आहे, त्यास मंजूरी देण्यांत येते.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा सपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद